# Question Paper

| | |
|---|---|
| **Name of the Post:** | Administrative Officer |
| **Date of the Examination:** | 2nd Dec 2022 |
| **Duration :** | 60 minutes |
| **Total Marks :** | 100 |

**Question Number : 1 Question Id : 750782679**

इ. स. 1912 मधे आयोजित केलेल्या महाराष्ट्र अस्पृश्यता निवारण परिषदेचे अध्यक्ष कोण होते ?

**Options :**

1. रा. गो. भांडारकर
2. म. गो. रानडे
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर
4. विठ्ठल रामजी शिंदे

**Question Number : 2 Question Id : 750782680**

आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करणाऱ्या पटेल विधेयकास पाठिंबा देण्यासाठी लिहिले गेलेले प्रसिद्ध नाटक कोणते ?

**Options :**

1. किचक वध
2. प्रणय प्रभाव
3. लोकमंत्र्याचा दौरा
4. लग्नाची बेडी

**Question Number : 3 Question Id : 750782681**

मुंबई शहर कोणत्या अक्षवृत्तावरती आणि रेखावृत्तावरती वसलेले आहे ?

**Options :**

1. 16° उत्तर व 70° पूर्व

2. 17° उत्तर व 71° पूर्व

3. 18° उत्तर व 72° पूर्व

4. 19° उत्तर व 73° पूर्व

**Question Number : 4 Question Id : 750782682**

सन् 2011 च्या जनगणता अंतिम मोजनीनुसार महाराष्ट्रात खालीलपैकी किती टक्के साक्षरता होती ?

**Options :**

1. 77.27%

2. 82.3%

3. 64.4%

4. 73.45%

**Question Number : 5 Question Id : 750782683**

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये पंतप्रधान अध्यक्ष असणाऱ्या समितीच्या शिफारीशीनुसार राष्ट्रपती ________ ची नियुक्ती करतात.

**Options :**

1. केंद्रिय मुख्य माहिती आयुक्त

2. राज्याचे मुख्य माहिती आयुक्त

3. सर्वोच्च न्यायालयाचे माहिती आयुक्त

4. राष्ट्रपती कार्यालयाचे सचिव

**Question Number : 6 Question Id : 750782684**

माहिती म्हणजे कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामधे समावेश होतो

अ. अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापणे, ई मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिद्धिपत्रके, परिपत्रके, आदेश.

ब. रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने.

क. कोणतीही ईलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधार सामग्री.

ड. अंमलात आलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळवता येईल अशी कोणत्याही फक्त सार्वजनिक निकायाशी संबंधित माहिती.

वरीलपैकी कोणते विधान / विधाने बरोबर आहेत ?

**Options :**

1. फक्त अ
2. फक्त अ आणि ब
3. अ, ब आणि क
4. अ, ब आणि ड

**Question Number : 7 Question Id : 750782685**

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातंर्गत खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे ?

अ. 26 नोव्हेंबर 1949 यादिवशी ही राज्यघटना स्वीकृत केली असे सरनाम्यात म्हटले आहे

ब. 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्तीने राज्यघटनेच्या सरनाम्यात प्रथमच दुरुस्ती करण्यात आली

क. सरनाम्यात सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, अध्यक्षीय गणराज्य या शब्दांचा समावेश करण्यात आला आहे

ड. सरनाम्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायाचा उल्लेख करण्यात आला आहे

**Options :**

1. अ आणि ब अयोग्य आहेत
2. अ, क आणि ड अयोग्य आहेत
3. वरीलपैकी सर्व अयोग्य आहेत
4. फक्त क अयोग्य आहे

**Question Number : 8 Question Id : 750782686**

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये कोणत्या दुरुस्ती कायद्याने सुधारणा करण्यात आली आहे ?

**Options :**

1. 27 वी घटनादुरुस्ती
2. 42 वी घटनादुरुस्ती
3. 44 वी घटनादुरुस्ती
4. 40 वी घटनादुरुस्ती

**Question Number : 9 Question Id : 750782687**

आय पी ॲड्रेस 127.0.0.1 हा __________ प्रकारचा आय पी ॲड्रेस आहे.

**Options :**

1. लिमीटेड ब्रॉडकास्ट ॲड्रेस
2. लूप बॅक ॲड्रेस
3. मल्टीकास्ट ॲड्रेस
4. डायरेक्ट ब्रॉडकास्ट ॲड्रेस

**Question Number : 10 Question Id : 750782688**

__________ हे कोविड-19 विरूध्दच्या आमच्या एकत्रित लढयात अत्यावश्यक आरोग्य सेवा भारतातील लोकांशी जोडण्यासाठी भारत सरकारने विकसित केलेले मोबाईल ऍप्लिकेशन आहे.

**Options :**

1. आयकर सेतू ॲप
2. भीम UPI ॲप
3. डिजिलॉकर
4. आरोग्य सेतू

**Question Number : 11 Question Id : 750782689**

मानव अधिकार संरक्षण अधिनियम, 1993 च्या कलम 3 मध्ये 2019 ला झालेल्या सुधारणेनुसार __________ चा समावेश झाला.

अ. दोन ऐवजी तीन सदस्य

ब. एक महिला सदस्य असणे आवश्यक आहे

क. आयोगाचे अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश किंवा न्यायाधीश असतील

**Options :**

1. फक्त अ
2. फक्त ब
3. ब व क
4. वरिल सर्व

**Question Number : 12 Question Id : 750782690**

इंटरनॅशनल कोव्हेनंट ऑन इकॉनॉमीक, सोशल ॲन्ड कल्चरल राईटस हे कुणाद्धारे स्विकृत करण्यात आले ?

अ. संयुक्त राष्ट्रसंघाची आमसभा

ब. आंतरराष्ट्रीय न्यायालय, हेग

क. संयुक्त राष्ट्रसंघाची सुरक्षा परिषद

ड. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना

वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहेत ?

**Options :**

1. फक्त अ
2. फक्त ब
3. फक्त ब आणि क
4. फक्त क आणि ड

**Question Number : 13 Question Id : 750782691**

2021 मध्ये खालीलपैकी कोणाला पद्मविभूषण पुरस्कार प्राप्त झाला आहे ?

अ. शिंझो अ‍ॅबे

ब. एस. पी. बालसुब्रमण्यम

क. बेल्ले मोनाप्पा हेगडे

ड. तरुण गोगोई

**Options :**

1. फक्त अ, ब, ड
2. फक्त अ, क, ड
3. फक्त ब, क, ड
4. फक्त अ, ब, क

**Question Number : 14 Question Id : 750782692**

सहाव्या प्रादेशिक अंतराळ शैक्षणिक केंद्राच्या सामंजस्य करारावर ________ येथे ________ रोजी स्वाक्षरी करण्यात आली.

**Options :**

1. मुंबई, 25 नोव्हेंबर, 2021
2. पाटना, 25 नोव्हेंबर, 2021
3. बंगलोर, 26 डिसेंबर, 2021
4. रांची, 26 डिसेंबर, 2021

**Question Number : 15 Question Id : 750782693**

नासा (NASA) ने नुकतेच जगातील सर्वात मोठ्या टेलिस्कोपला कोणत्या नावाने अंतराळात प्रक्षेपित केले ?

**Options :**

1. फायरविंग टेलिस्कोप
2. लेंस कोर टेलिस्कोप
3. एक्स मोर टेलिस्कोप

4. जेम्स वेब टेलिस्कोप

**Question Number : 16 Question Id : 750782694**

'सीड क्वीन' या नावाने प्रसिद्ध पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या विषयी खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे ?

अ. पद्मश्री राहीबाई पोपेरे ह्या अकोले तालुक्यातील कोभांळणे गावात राहतात

ब. सध्या राहीबाईच्या बिवाले बंकेत 53 पिकांचे 194 वाण संकलित आहेत.

क. त्यांनी अकोले तालुक्यातील दरा गावामध्ये महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प सुरू केल आहे.

ड. राहीबाईंच्या संशोधनाला भारत सरकारचा निधी प्राप्त होतो

**Options :**

1. अ, ब, क योग्य आहे
2. फक्त ड योग्य आहे
3. अ, व ब योग्य आहे
4. फक्त ब, व क योग्य आहे

**Question Number : 17 Question Id : 750782695**

राजू आणि गणू दोघेही 'P' बिंदूपासून दूर चालत आहे. 'P' बिंदूपासून राजू 3 मी. व गणू 4 मी. चालले. त्यानंतर राजू 'P' बिंदूच्या उत्तरेकडे 4 मी. चालला आणि गणू हा राजूच्या दक्षिणेकडे 5 मी. चालला तर दोघांमधील अंतर किती ?

**Options :**

1. 11.40 मी.
2. 19.50 मी.
3. 5 मी.
4. 16 मी.

**Question Number : 18 Question Id : 750782696**

**सूचना : खालील दिलेल्या विधानाच्या सहाय्याने प्रश्नाचे उत्तर लिहावे.**

M, N, O, P, Q आणि R या नावाच्या सहा इमारती रस्त्याच्या प्रत्येक बाजूस तीन प्रमाणे उभ्या आहेत. त्यांचे रंग हिरवा, पिवळा, जांभळा, पांढरा, लाल आणि निळा असे भिन्न रंग आहेत आणि त्यांची उंची ही भिन्न आहेत. Q ही सर्वात उंच इमारत हिरव्या इमारतीच्या अगदी विरुद्ध बाजूस आहे. सर्वात लहान इमारत ही जांभळ्या इमारतीच्या विरुद्ध बाजूस आहे. R पांढऱ्या रंगाची इमारत ही M आणि P यांच्या मध्ये आहे. O लाल इमारत ही M च्या अगदी विरुद्ध बाजूस आहे. N जांभळ्या रंगाची इमारत ही R च्या अगदी विरुद्ध बाजूस आहे. M निळ्या रंगाची इमारत ही O पेक्षा उंच असून ती P आणि N पेक्षा लहान आहे. तर सर्वात उंच इमारतीचा रंग कोणता आहे ?

**Options :**

1. हिरवा
2. लाल
3. पिवळा
4. जांभळा

**Question Number : 19 Question Id : 750782697**

'C' ला एक काम करण्यासाठी 4 दिवस व D ला तेच काम करण्यासाठी 5 दिवस लागतात, दोघांनी मिळून काम पूर्ण केल्यास त्यांना 360 रु. मिळतात. तर D चा वाटा किती ?

**Options :**

1. रु. 180
2. रु. 160
3. रु. 200
4. रु. 220

**Question Number : 20 Question Id : 750782698**

निधीचे गुणांक नेहा पेक्षा जास्त आहे. हर्षचे गुणांक राकेश एवढे आहे. राहूलचे गुणांक शितल पेक्षा कमी आहे. नेहाचे गुणांक हर्ष पेक्षा जास्त आहे. शितलचे गुणांक राकेश पेक्षा कमी आहे. तर सर्वात कमी गुणांक कोणाचे आहे ?

**Options :**

1. शितल
2. हर्ष
3. राहूल
4. निधी

**Question Number : 21 Question Id : 750782699**

सावधी नियुक्ती पदासह ज्या स्थायी पदावर शासकीय कर्मचाऱ्याची कायमपणे नियुक्ती केलेली असेल असे स्थायी पद कायमपणे धारण करण्याचा हक्क म्हणजे

**Options :**

1. स्थानिक भत्ता
2. पदग्रहण अवधी
3. स्थानापन्न
4. धारणाधिकार

**Question Number : 22 Question Id : 750782700**

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियमातील तरतूदीनुसार प्रत्येक कार्यालय प्रमुखाने त्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय कर्मचाऱ्यांना प्रत्येक आर्थिक वर्षात सेवापुस्तक दाखविणे व त्याची सही घेणे आवश्यक आहे. मागील वित्तीय वर्षात या अनुषंगाने केलेली कार्यवाही कार्यालय प्रमुखाने दरवर्षी कोणत्या महिन्यात त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे ?

**Options :**

1. मे
2. सप्टेंबर

3. जुलै

4. जानेवारी

**Question Number : 23 Question Id : 750782701**

शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या नियुक्तीच्या तारखेपासून किती महिन्यांच्या आत वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले पाहिजे ?

**Options :**

1. एक महिना

2. दोन महिने

3. सहा महिने

4. बारा महिने

**Question Number : 24 Question Id : 750782702**

वेतन या संज्ञेत कोणत्या बाबींचा समावेश होतो ?

अ. वैयक्तिक वेतन

ब. विशेष वेतन

क. शासनाकडून वेतन म्हणून खास वर्गीकृत करण्यात येईल अशी इतर कोणतीही वित्तलब्धी

ड. वाहन भत्ता

**Options :**

1. वरील सर्व

2. अ, ब, व क

3. अ व ब

4. केवळ अ

**Question Number : 25 Question Id : 750782703**

शासकीय कर्मचारी ज्या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत होता, अशा पदाला लागू असलेल्या समय श्रेणीतील पुढीलपैकी कोणता कालावधी वेतन वादीसाठी ग्राह्य घरला जातो

अ. असाधारण रजा वगळून सर्व प्रकारच्या रजा

ब. वैद्यकिय कारणासाठी घेतलेली असाधारण रजा

क. भारतात किंवा भारताबाहेर प्रतिनियुक्ती किया दुसऱ्या विभगात तात्पुरती बदली

ड. वैयक्तिक कारणास्तव घेतलेली असाधारण रजा

**Options :**

1. अ, ब, क
2. ब, क, ड
3. केवळ अ व ब
4. केवळ क व ड

**Question Number : 26 Question Id : 750782704**

शासकीय कर्मचारी भारताबाहेर रजेवर असताना त्याची प्रतिनियुक्ती करण्यात आली तर, त्याला स्वेच्छेने पुढीलपैकी कोणत्याही एका पर्यायाची निवड करता येईल.

अ. त्याला आपल्या रजेचा उपभोग घेणे चालू ठेवता येईल व त्या प्रकरणी प्रतिनियुक्तीच्या कालावधीत त्याच्या भारतातील वेतनाच्या एकषष्ठांश इतके मानधन त्याला देता येईल.

ब. त्याला आपली रजा खंडित करता येईल व मंजूर करण्यात आलेल्या रजेपैकी उरलेली रजा, प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर घेता येईल.

**Options :**

1. अ व ब बरोबर
2. अ व ब यापैकी कोणताही नाही
3. अ बरोबर ब चूक
4. ब बरोबर अ चूक

**Question Number : 27 Question Id : 750782705**

निलंबनाधीन शासकीय कर्मचाऱ्याच्या निर्वाह भत्त्यामधून खालीलपैकी कोणत्या सक्तीच्या वजाती केल्याच पाहिजेत ?

अ. आयकर व व्यवसायकर

ब. लायसन्स फी व संलग्न आकार

क. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची वर्गणी

**Options :**

1. अ व ब

2. अ व क

3. ब व क

4. वरील सर्व

**Question Number : 28 Question Id : 750782706**

श्री. जगताप यांची एकाच शहरातील एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात बदली झली त्यांना शनिवारी मध्यान्हनंतर कार्यमुक्त करण्यात आले व ते दुसऱ्या कार्यालयात सोमवारी मध्यान्ह पूर्व रूजू झाले

अ. एकाच ठिकाणी प्रत्यक्ष कार्यलय बदलते तेव्हा जास्तीत जास्त एका दिवसाचा पदग्रहण अवधी अनुज्ञेय असतो.

ब. सुटीचा दिवस किंवा रविवार हा या नियमाच्या प्रयोजनार्थ एक दिवस म्हूणून धरला जातो.

**Options :**

1. दोन्हीही विधान बरोबर आहेत

2. अ विधान बरोबर आहे

3. ब विधान बरोबर आहे

4. दोन्हीही विधान चुकीची आहेत

**Question Number : 29 Question Id : 750782707**

म.ना.से (रजा) नियम, 1981 मधील नियम क्र. 15 अन्वये

अ. कोणत्याही प्रकारची रजा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या रजेबरोबर किंवा अशा रजेला जोडून मंजूर करता येते.

ब. नैमित्तिक रजा, अनुज्ञेय असलेल्या इतर कोणत्याही प्रकारच्या रजेला जोडून घेता येते.

**Options :**

1. अ योग्य ब अयोग्य

2. ब योग्य अ अयोग्य

3. अ व ब दोन्ही योग्य

4. अ व ब दोन्ही अयोग्य

**Question Number : 30 Question Id : 750782708**

शासकीय कर्मचाऱ्याच्या रजेच्या बाबतीत खालीलपैकी सर्वात योग्य पर्याय निवडा

**Options :**

1. रजा शिल्लक असल्यास रजेवर जाण्याचा हक्क असतो

2. रजा हा हक्क नाही, परंतु पूर्वपरवानगीने रजा घेता येते

3. पूर्वपरवानगीशिवाय रजा उपभोगल्यास, नंतर रजा हा हक्क म्हणून मंजूर करून घेता येते

4. वरील सर्व बरोबर

**Question Number : 31 Question Id : 750782709**

संपूर्ण सेवेच्या कालावधीत कमाल __________ दिवसांपर्यंत अनर्जित रजा घेता येते.

**Options :**

1. 90

2. 70

3. 180

4. 360

**Question Number : 32 Question Id : 750782710**

शासकीय कर्मचाऱ्याला निवृत्तीवेतनाच्या किती टक्के पेक्षा अधिक होणार नाही, इतक्या भागाची रोख रकमेच्या प्रदानासाठी अंश राशीकरण करण्याचा अधिकार आहे ?

Options :

1. 1/2
2. 1/3
3. 30%
4. 40%

**Question Number : 33 Question Id : 750782711**

विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही प्रलंबित असेल तर सेवानिवृतीच्या तारखेपासून सुरु होणाऱ्या ________ महिन्यांच्या कालावधीकरीता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास कार्यालय प्रमुख तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करेल.

Options :

1. 3
2. 6
3. 12
4. 8

**Question Number : 34 Question Id : 750782712**

म.ना.से. (शिस्त व अपील) अंतर्गत खालीलपैकी कोणत्या आदेशा विरुद्ध अपील करता येते ?

अ. म.ना.से. (शिस्त व अपील) नियम 1979 नियम 4 अन्वये काढलेला निलंबन आदेश

ब. म.ना.से. (शिस्त व अपील) नियम 1979 नियम 5 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा आदेश

क. उपरोक्त 'ब' च्या नियमान्वये केलेल्या कोणत्याही शिक्षा वाढविणाऱ्या आदेश

ड. राज्यपालांनी दिलेला कोणताही आदेश

Options :

1. फक्त अ
2. फक्त अ व ब
3. फक्त अ, ब, क

4. वरील सर्व

**Question Number : 35 Question Id : 750782713**

ज्या प्रकरणात ________ किंवा अधिक शासकीय कर्मचारी संबंधित असतील अशा कोणत्याही बाबतीत राज्यपाल किंवा अशा सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यास सक्षम असलेला दुसरा कोणताही प्राधिकारी एकत्रित कार्यवाही करून त्या सर्व कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचा निदेश देणारा आदेश देऊ शकेल.

**Options :**

1. 4
2. 5
3. 2
4. 3

**Question Number : 36 Question Id : 750782714**

म.ना.से. (वर्तणूक) नियम, 1979 नुसार ‘जंगम मालमत्ता’ या संज्ञेमध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश होणार नाही ?

**Options :**

1. जडजवाहीर
2. शेअर्स
3. वाहने
4. शेतजमीन

**Question Number : 37 Question Id : 750782715**

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 च्या अनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेतर) संघटनेच्या सदस्यास लाभ मिळण्याच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान/विधाने अयोग्य आहेत?

अ. संघटनेचा कोणताही सदस्य, तो किमान सहा महिने सदस्य असल्याखेरीज आणि त्याने संपूर्ण वर्गणी दिली असल्याखेरीज, संघटनेचे कोणतेही लाभ मिळविण्याचा हक्क त्याला असणार नाही.

ब. संघटनेच्या ज्या सदस्याची वर्गणी थकीत किंवा देय आहे, त्या सदस्याला तो अशी सर्व थकबाकी चुकती करेपर्यंत आणि अशी थकबाकी दिल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांचा कालावधी जाईपर्यंत कोणतेही लाभ मिळविण्याचा हक्क असणार नाही.

**Options :**

1. केवळ अ
2. केवळ ब
3. दोन्ही योग्य
4. दोन्ही अयोग्य

**Question Number : 38 Question Id : 750782716**

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियम क्र. 26 संदर्भात खालील विधान चुकीचे आहे.

**Options :**

1. कोणताही शासकीय कर्मचारी, ज्याचा जीवनसाथी हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह करणार नाही.
2. शासकीय कर्मचारी विवाहाच्या वेळी हुंडा घेऊ अथवा देऊ शकणार नाही किंवा देण्यास चिथावणी देऊ शकणार नाही.
3. ज्याचा जीवनसाथी हयात आहे असा कोणताही शासकीय कर्मचारी कोणत्याही व्यक्तीशी विवाहविषयक करार करणार नाही.
4. भारतीय नागरिक नसणाऱ्या व्यक्तीशी विवाह केलेल्या किंवा विवाह करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याबाबत शासनास कळविणे आवश्यक आहे.

**Question Number : 39 Question Id : 750782717**

खालील विधाने विचारात घेऊन त्याखाली दिलेल्या उत्तरातून योग्य पर्याय निवडा. वित्तिय वर्षभरात सुधारलेले अंदाज तयार करताना खालीलपैकी कोणत्या गोष्ठी लक्षात घेतल्या पाहिजेत ?

अ. चालू वर्षातील पहिल्या 4/8/9 महिन्याच्या प्रत्यक्ष रकमा

ब. मागील वर्षाच्या पहिल्या 4/8/9 महिन्याच्या प्रत्यक्ष रकमा

क. मागील वर्षाच्या शेवटच्या 8, 4 किंवा 3 महिन्याच्या प्रत्यक्ष रकमा

**Options :**

1. फक्त अ व ब बरोबर
2. फक्त ब व क बरोबर
3. अ, ब व क तिन्ही बरोबर
4. फक्त अ व क बरोबर

**Question Number : 40 Question Id : 750782718**

पायाभूत सुविधा निर्माण करणारे विभाग म्हणून __________यांना धनादेशाने शासन लेख्यातून थेट अनुदान आहरित करण्याचे विशेष अधिकार देण्याचे आदेश वित्त विभागाने निर्गमित केले आहेत.

**Options :**

1. सामान्य प्रशासन व वित्त विभाग
2. जलसंपदा व महसूल विभाग
3. जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभाग
4. महसूल व सामान्य प्रशासन विभाग

**Question Number : 41 Question Id : 750782719**

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक __________ च्या शासन निर्णयातील नियमांचे पालन करून खरेदी प्रक्रिया पार पाडण्याचे प्रमाणपत्र खरेदीच्या देयकांसोबत जोडणे आवश्यक आहे.

**Options :**

1. 1 डिसेंबर 2016
2. 1 जानेवारी 2016

3. 31 डिसेंबर 2016

4. 1 डिसेंबर 2017

**Question Number : 42 Question Id : 750782720**

ज्येष्ठता सूचीत नाव समाविष्ठ करण्याच्या अनुषंगाने खालील विधाने विचारात घेऊन उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

अ. तात्पुरती पदोन्नतीने नियुक्त कर्मचाऱ्याचे नाव ज्येष्ठतासूचीत समाविष्ट करावे

ब. तदर्थ पदोन्नतीने नियुक्त कर्मचाऱ्याचे नाव ज्येष्ठतासूचीत समाविष्ट करावे

**Options :**

1. फक्त अ बरोबर

2. फक्त ब बरोबर

3. अ व ब बरोबर

4. अ व ब दोन्ही चूक

**Question Number : 43 Question Id : 750782721**

तात्पुरती ज्येष्ठता यादी प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून __________ दिवसांत संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांकडून त्याबाबतच्या सूचना व हरकती मागविण्यात येतील.

**Options :**

1. 12

2. 15

3. 30

4. 20

**Question Number : 44 Question Id : 750782722**

निकडीच्या स्वरूपाच्या अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतात ?

**Options :**

1. साधारण

2. असाधारण

3. विशेष

4. अतितात्काळ

**Question Number : 45 Question Id : 750782723**

खालील विधाने विचारात घेऊन उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

अ. ‘ब’ वर्गातील अभिलेख 40 वर्षे जतन करण्यात यावेत

ब. ‘क’ वर्गातील अभिलेख 10 वर्षे जतन करण्यात यावेत

**Options :**

1. फक्त अ बरोबर

2. फक्त ब बरोबर

3. अ व ब  दोन्ही बरोबर

4. अ व ब दोन्ही चूक

**Question Number : 46 Question Id : 750782724**

एखाद्या फायलीतील सर्व विचाराधीन प्रश्नांवरील कार्यवाही पूर्ण झाल्यावर ती फाईल बंद करण्याची कार्यपद्धती म्हणजे __________ होय.

**Options :**

1. वर्गीकरण

2. अभिलेखन

3. निरीक्षण

4. चिन्हांकन

**Question Number : 47 Question Id : 750782725**

खालीलपैकी कोणत्या नियमानुसार शासकीय कार्यालयानी 'नागरिकांची सनद' तयार करून प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे ?

Options :

1. महाराष्ट्र लोकसेवा हक्क नियम, 2016

2. शासकीय कर्त्यव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम, 2013

3. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, 2006

4. वरीलपैकी सर्व

**Question Number : 48 Question Id : 750782726**

विनियोजन विधेयक विधीमंडळात मंजूर होईपर्यंत नवीन वर्षाच्या काही कालावधीच्या खर्चासाठी विधीमडंळाने मंजूर केलेल्या आगाऊ अनुदानास काय म्हणतात ?

Options :

1. पूरक अनुदान

2. लेखानुदान

3. अर्थसंकल्पीय अनुदान

4. लाक्षणिक अनुदान

**Question Number : 49 Question Id : 750782727**

राज्य शासनाच्या वतीने उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी खालीलपैकी कोण आहेत ?

Options :

1. सहसचिव/उपसचिव दर्जाचे व त्यावरील दर्जाचे अधिकारी

2. अवर सचिव दर्जाचे व त्यावरील दर्जाचे अधिकारी

3. कक्ष अधिकारी दर्जाचे व त्यावरील दर्जाचे अधिकारी

4. वरीलपैकी सर्व

**Question Number : 50 Question Id : 750782728**

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, 1988 मधील व्याख्येनुसार शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या कायदेशीर कामाच्या मोबदल्या व्यतिरीक्त कोणत्याही व्यक्तिकडून स्वत:साठी अथवा इतर व्यक्तिच्या कामाच्या मोबदल्यात बक्षिसी स्वीकारल्यास

**Options :**

1. गुन्हा नाही
2. परिश्रमिक आहे
3. गुन्हा आहे
4. (1) व (2) बरोबर आहे